# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,

**गडचिरोली. दिनांक ११/०१/२०१८**

## *पोलीस माओवादी चकमकीत ०१ जहाल माओवादी ठार*

दिनांक १०/०१/२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अपर पोलीस अधिक्षक (नक्षल सेल) गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी साो., मा. अपर पोलीस अधिक्षक (अहेरी) श्री. राजा रामासामी साो., मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) गडचिरोली डॉ. हरी बालाजी साो. यांच्या आदेशानुसार मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, एटापल्ली श्री. किरणकुमार सुर्यवंशी साो. यांच्या मार्गदर्शनाखाली जलद प्रतिसाद दल उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके हालेवारा हद्दितील मौजा ताडपल्ली जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवित असताना सायंकाळी ०४.३० ते ०५.०० वाजेच्या सुमारास दबा धरुन बसलेल्या माओवादयांनी जलद प्रतिसाद दलाच्या जवानांवर अंदाधुद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल आणि स्वसंरक्षणार्थ पोलीसांनी माओवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान एका जहाल माओवादयाला कंठस्नान घालण्यात पोलीस दलाला यश प्राप्त झाले. माओवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

त्यानंतर घटनास्थळावर शोधमोहिम राबविली असता ०१ पुरुष माओवादी मृतदेह नक्षलवेषात मिळाला असून एक ०.३०३ रायफल आणि ४ जिवंत काडतुसे त्यामध्ये २ काडतुसे ०.३०३ चे व २ काडतुसे १२ बोअर रायफलची आहेत. तसेच मोठया प्रमाणावर नक्षल साहित्य मिळून आले. मृत माओवादी याची ओळख पटविण्याचे काम चालु आहे. चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.